# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील
# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन
## प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३ (FCFS-३) दि.०६.१०.२०१७
## कार्यपध्दती व वेळापत्रक

इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि.०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. दिनांक २५.०९.२०१७ अखेर इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या नियमित चार फे-या, विशेष फेरी-१ , प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-१, दुसरी विशेष फेरी व प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-२ अशा एकूण ०८ फे-या झालेल्या आहेत. आलेल्या एकूण अर्जांपैकी ९९ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. तसेच आज दि.०६.१०.२०१७ रोजी प्रवेशाच्या संकेतस्थळावर प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३ साठी रिक्त जागांचा तपशील जाहीर केलेला आहे.

**प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३ (FCFS-३)ही अंतिम फेरी साठी कार्यपध्दती व वेळापत्रक खालील प्रमाणे असेल**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | दि.०९.१०.२०१७ ते दि.११.१०.२०१७ (०३ दिवस) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत | **१) नवीन अर्ज करणे, अपुर्ण अर्ज ॲप्रुव्ह करणे..**<br>i) ज्या इ.१०वी उत्तीर्ण/एटीकेटी विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत ऑनलाईन अर्जच केला नाही अशा विद्यार्थ्यांनी नवीन माहिती पुस्तिका घेऊन लॉगइन आयडी व पासवर्ड च्या सहाय्याने ऑनलाईन अर्ज भाग-१ पूर्ण करुन मार्गदर्शन केंद्राकडून भाग-१ ॲप्रुव्ह करुन घेणे.<br>ii) **अपुर्ण अर्ज पुर्ण करणे....**ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी अर्ज केला आहे परंतु भाग-१ मध्ये Pending status असेल अशा विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केंद्राकडून भाग-१ ॲप्रुव्ह करुन घेणे.<br>iii) स्थलांतरीत विद्यार्थी नवीन अर्ज भरुन ॲप्रुव्हल घेऊन प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य-३ मध्ये भाग घेऊ शकतील.<br>**२) इ. १० वी उत्तीर्ण व एटीकेटी प्राप्त झालेले परंतु कोणत्याही ठिकाणी प्रवेशित न झालेले (Admit) न झालेले विद्यार्थी या फेरीमध्ये ऑनलाईन क्लिक करुन ॲलोकेशन मिळवतील.**<br>**३) विद्यार्थ्यांना यापूर्वीचा मिळालेला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास पुढील कारणास्तव**<br>i) इ.११ वी व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमास प्रवेश घेणेसाठी (आयटीआय, डिप्लोमा इ.)<br>ii) ऑनलाईन क्षेत्राबाहेरील महाविद्यालयात इ.११वी साठी प्रवेश घेणेसाठी<br>iii) ज्या शाखेत प्रवेश घेतलेला आहे परंतु काही कारणास्तव शाखा बदल करावयाचा आहे असे विद्यार्थी .<br>iv) शाखा तीच ठेवून शाखा बदल करावयाचा आहे असे विद्यार्थी<br>v) प्रवेश रद्द करण्याची लिंक प्रवेश प्रक्रियेच्या वेळेत रिअल टाईम उपलब्ध राहणार आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | दि.०९.१०.२०१७<br>ते<br>दि.११.१०.२०१७<br>(०३ दिवस) | सकाळी १०.०० ते<br>सायं. ५.०० वाजेपर्यंत | ऑनलाईन क्लिक करुन अलोकेशन मिळालेल्या विद्यार्थ्यांनी संबधित कॉलेजमध्ये जाऊन प्रवेश घेणे.<br>---------------------------------------------<br>संबधित कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन क्लिक करुन अलोकेशन झालेल्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा. |
| ३ | दि.११.१०.२०१७ | सायंकाळी ६.०० वाजता<br>इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ संपली असे जाहिर करणे. | |

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना :-**

१) जे विद्यार्थी प्रवेश रद्द करु इच्छित आहेत (वरील अ.क्र.१ मधील iii,iv मध्ये नमूद) अशा विद्यार्थ्यांना FCFS-3 फेरी मध्ये उपलब्ध होणा-या रिक्त जागांमधूनच FCFS नुसारच प्रवेश घेता येईल. FCFS असल्यामुळे याक्षणी रिक्त दिसणारी जागा पुढच्या क्षणी भरली जावू शकते कारण एकाच वेळी इतर कोणता तरी विद्यार्थी त्याच जागेवर इतर ठिकाणाहून ऑनलाईन प्रवेश घेऊ शकतो, त्यामुळे प्रवेश रद्द केल्यास व तद्नंतर महाविद्यालयांची निवड करण्याची व प्रवेश घेण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी व पालकांची असेल, त्यामुळे विचारपुर्वकच प्रवेश रद्द करावा.

**२) इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाकरिता ही शेवटची फेरी असून या फेरीत देखील प्रवेश न घेतल्यास याची जबाबदारी संपूर्णपणे विद्यार्थ्यांची व पालकांची राहील.** यानंतर कोणतीही प्रवेश फेरी घेतली जाणार नाही. तसेच दि. ११ ऑक्टोबर २०१७ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता सन २०१७-१८ ची इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपुष्टात येईल, व तसेच कोणताही प्रवेश यापुढे ऑफलाईन पध्दतीने केला जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

३) भविष्यात असे जर ऑफलाईन पध्दतीने प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिध्दीनिवेदन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१